मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :१८ | रविवार दि.०३ ऑगस्ट ते शनिवार ०९ ऑगस्ट २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी बदलाची नांदी'

पान ३ — पेल्हारः अनधिकृत बांधकामांवर...

पान ४ — महसूल सप्ताहः जनतेशी थेट संवाद..

# वसई-विरार महाघोटाळा : ईडीची कारवाई, ३२ कोटींचा बेहिशोबी माल जप्त; राजकीय वर्तुळात खळबळ!

वसई-विरार महानगरपालिकेतील नगररचना विभागात २००९ ते २०१२ दरम्यान झालेल्या बेकायदेशीर बांधकाम घोटाळ्याची चौकशी अखेर निर्णायक वळणावर आली असून, सक्तवसुली संचालनालयाने (ED) केलेल्या कारवाईत ३२ कोटी रुपयांचा बेहिशोबी माल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात माजी आयुक्त अनिलकुमार पवार आणि नगररचना उपसंचालक वाय.एस. रेड्डी हे प्रमुख आरोपी आहेत.या घोटाळ्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, विरोधकांनी सत्ताधारी गटावर 'संरक्षण आणि संगनमताचे' आरोप लावले आहेत, तर सत्ताधाऱ्यांनी या कारवाईचे श्रेय घेत 'भ्रष्टाचारविरोधातील शून्य सहनशीलतेची भूमिका' पुन्हा अधोरेखित केली आहे.ईडीच्या तपासानुसार, २००९ ते २०१२ दरम्यान नगररचना अधिकाऱ्यांनी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी आरक्षित असलेल्या ६० एकर जमिनीवर ४१ बेकायदेशीर इमारती उभारण्यास परवानगी दिली. या व्यवहारात प्रति चौरस फूट २०-२५ रुपयांचा 'कमिशन' घेतल्याचा आरोप आहे. बिल्डर्स, आर्किटेक्ट्स, लायझनर्स आणि दलालांशी संगनमत करून हे घडल्याचे निदर्शनास आले आहे.वाय.एस. रेड्डी हैदराबादः ८.६ कोटी रोख, २३ कोटींचे दागिने अनिलकुमार पवार मुंबई, पुणे, नाशिकः १२ ठिकाणी छापे, १.३३ कोटी रोख, अनेक शेल कंपन्यांची माहिती शेकडो कोटींचा प्रकल्प फसवणूक प्रकरणात अडकले या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, संबंधितांवर PMLA (Money Laundering Act), IPC ४२० (फसवणूक), IPC ४६८/४७१ (बनावट कागदपत्र वापर) आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा




अंतर्गत गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. न्यायालयीन प्रक्रियेद्वारे संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याच्या हालचाली सुरू आहेत.२०२५ मध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बेकायदेशीर इमारती पाडण्यात आल्या, त्यामुळे हजारो कुटुंबांना फसवणुकीला सामोरे जावे लागले.अनेकांना घरासाठी कर्ज घ्यावे लागले, ज्याचा हप्ता भरूनही आता ते घरांच्या बाहेर आहेत.या घोटाळ्याची चौकशी राजकीय संरक्षण, प्रशासकीय निष्क्रियता आणि जनतेची फसवणूक या सर्व अंगांनी होत आहे. या पार्श्वभूमीवर वसई-विरारमधील जनतेने आता जागरूक राहून प्रश्न विचारणे, माहिती मागवणे आणि लोकप्रतिनिधींना जबाबदार धरणे हे काम सुरू करायला हवे. फक्त छापे नव्हे, तर शिक्षा झालीच पाहिजे!'

या प्रकरणाने स्पष्ट झाले की शहरी नियोजन व्यवस्थेत गंभीर धोक्यांची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. ३२ कोटींची संपत्ती जप्त होणे ही बाब धक्कादायक असली तरी राजकीय आणि प्रशासकीय जबाबदारीही निश्चित होणे गरजेचे आहे.जर या प्रकरणात आरोपींना शिक्षा झाली नाही, तर भविष्यात अशा प्रकरणांची पुनरावृत्ती होणे अटळ आहे. तसेच, भविष्यातील प्रकल्पांमध्ये पारदर्शकता ठेवण्यासाठी 'डिजिटल मंजुरी प्रक्रिया', `ऊष निगराणी समित्या, आणि नागरिकांना थेट माहिती देणाऱ्या पोर्टल्स सुरु करणे तातडीचे झाले आहे.

## डॉ. दिनेश कांबळे व डॉमिनिक डिमेलो यांची काँग्रेस प्रदेश कार्यकारिणीत सरचिटणीस पदावर नियुक्ती — स्थानिक राजकारणाला नवे वळण!

### वसई-विरार काँग्रेससाठी नवी संधी, आंबेडकरी समाजातील नेतृत्व पुढे!

वसई, दि. ३१ (प्रतिनिधी) — मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव आणि आंबेडकरी समाजाचे अभ्यासक डॉ. दिनेश कांबळे (विरार) व काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते डॉमिनिक डिमेलो (वसई-माणिकपूर) यांची नुकतीच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे वसई-विरारच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा काँग्रेसला बळकटी मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे डॉ. दिनेश कांबळे हे आंबेडकरी समाजाचे



प्रभावी आणि अभ्यासू नेतृत्व मानले जाते. त्यांनी शिक्षण, सामाजिक समता, आर्थिक न्याय आणि राज्यघटना यावर मोठे काम केले असून त्यांच्या या अनुभवाचा पक्षाला मोठा फायदा होईल, असा विश्वास काँग्रेसचे वरिष्ठ नेते व्यक्त करत आहेत. त्यांच्या माध्यमातून काँग्रेसला वसई-विरार आणि पालघर परिसरात आंबेडकरी समाजाच्या पाठबळाचा राजकीय लाभ मिळू शकतो.तर दुसरे सरचिटणीस डॉमिनिक डिमेलो हे ख्रिश्चन समाजातील लोकप्रिय नेतृत्व मानले जाते. त्यांची सामाजिक व संघटन क्षमता, स्थानिक पातळीवरील प्रभाव आणि सतत मैदानात राहून कार्य करणारा कार्यकर्ता म्हणून ओळख असल्यामुळे तारापूर ते भायंदर या पट्ट्यात काँग्रेसचा प्रभाव वाढण्याची शक्यता आहे.

पान नं.२वर

## स्मशानभूमीत झुले बसवले; जनतेच्या संतापानंतर महापालिकेची माघार!

### वसई-विरार महापालिकेची गफलत — धार्मिक भावनांना ठेच, कायद्याच्या चौकटीबाहेर निणऱ्य, अखेर झुले काढले

वसई | प्रतिनिधी वसई-विरार महानगरपालिका प्रशासनाने वसईतील बेनापट्टी येथील स्मशानभूमीत झुले, व्यायाम साहित्य आणि बालोद्यानासाठी लागणारी साधने बसवून संतप्त जनतेच्या रोषाला तोंड दिले. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर सोशल मीडियावर चक्क 'भुतांच्या वेशात' निषेध नोंदवत नागरिकांनी प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला.या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावल्याने नागरिकांनी तीव्र शब्दात निषेध केला. अनेकांनी



प्रश्न विचारले की, 'जिथे मृत्यू झालेल्यांचे अंतिम संस्कार होतात, तेथे लहान मुलांनी खेळावं हे कोणत्या शहाण्याचं नियोजन?'या पार्श्वभूमीवर पालिकेने माघार घेत झुले हटवले असले, तरी या घटनेमुळे प्रशासनाच्या नियोजन क्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# संपादकीय...!

## भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी बदलाची नांदी'

भारतीय क्रीडाक्षेत्रात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि खेळाडूंचा निर्णायक सहभाग सुनिश्चित करणारे राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक हे देशासाठी मैलाचा दगड ठरण्याची क्षमता बाळगून आहे. अनेक दशकांपासून विविध क्रीडा महासंघांवर राजकीय व प्रशासकीय वर्चस्वाच्या छायेत कामकाज होत असल्याची टीका होत होती. आता यावर निश्चित आळा घालण्याचा सरकारचा निर्धार दिसतो.बीसीसीआयचा समावेशः एक ऐतिहासिक निणयभारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) हे आतापर्यंत सरकारच्या कक्षेबाहेर राहून काम करणारे शक्तिशाली संघटन होते. पण, ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश झाल्यानंतर, बीसीसीआयला राष्ट्रीय क्रीडा महासंघ म्हणून मान्यता मिळवणे आवश्यक ठरणार आहे. त्यासाठी 'टीम इंडिया' या नावाचा वापर करायचा असल्यास केंद्र सरकारकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य असेल. यामुळे बीसीसीआयलाही माहिती अधिकार कायद्याच्या चौकटीत यावे लागेल – ही पारदर्शकतेच्या दिशेने मोठी झेप आहे.खेळाडूंच्या सहभागाचे सुनिश्चितीकरण नवीन विधेयकात सर्व महासंघांमध्ये कमीत कमी दोन खेळाडू आणि चार महिला सदस्यांची नियुक्ती बंधनकारक केली आहे. यामुळे निणय प्रक्रियेत खेळाडूंचा थेट सहभाग वाढेल आणि लिंगसमानतेचा आदर्श प्रस्थापित होईल. तसेच, अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष या पदांवर सलग तीन टर्म, म्हणजेच १२ वर्षांच्या मर्यादेचे बंधन हे दीर्घकाळ एकाच नेतृत्वाखाली महासंघ न चालवता तरुण नेतृत्वाला संधी देण्याचे द्योतक ठरेल.कायद्यातील निर्णायक तरतुदी नवीन राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण हा क्रीडाक्षेत्रातील वाद सोडवण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम व्यासपीठ ठरणार आहे. त्याच्या निणयांना फक्त सर्वोच्च न्यायालयातच आव्हान देता येईल, ही व्यवस्था वादाच्या जलद निपटाऱ्याची हमी देते. राष्ट्रीय क्रीडा मंडळ (**NSB**) ही संकल्पना देखील विधेयकातील महत्त्वपूर्ण बाब आहे. हे मंडळ क्रीडा महासंघांना मान्यता देणे, निलंबित करणे, निवडणुका रद्द करणे आणि खेळाडूंशी संबंधित निणय घेण्यासाठी सक्षम असेल. तसेच महासंघांचे वार्षिक लेखापरीक्षण, सार्वजनिक निधीचा उपयोग यावर नियंत्रण ठेवून गैरव्यवहार टाळण्याचे अधिकार मंडळाकडे असतील.निवडणुकीत पारदर्शकता राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेल ही नवी संकल्पना घडवून आणल्यामुळे, क्रीडा महासंघांमध्ये होणारी निवडणूक फसवणूक, गटबाजी, किंवा राजकीय हस्तक्षेप यावर प्रभावी लगाम बसेल. ही समिती माजी निवडणूक अधिकारी किंवा अनुभवी व्यक्तींनी युक्त असणार आहे.

जागतिक स्वप्न आणि भारताचे स्थान

२०३६ मध्ये ऑलिंपिक भारतात घेण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी क्रीडा व्यवस्थेची नवी घडी बसवणे अत्यावश्यक आहे. सध्याचे कायदेशीर आणि प्रशासकीय आव्हाने दूर करत, जागतिक स्पर्धांमध्ये भारताच्या उपस्थितीसाठी आवश्यक ते सर्व निणय या विधेयकात घेतले गेले आहेत. बजेटमध्ये ३७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद हे या गंभीरतेचे द्योतक आहे.भारतीय क्रीडा प्रशासनात इतिहासात पहिल्यांदाच एवढा व्यापक, स्पष्ट आणि निर्णायक कायदेशीर बदल घडवून आणण्याचा हा प्रयत्न आहे. यामध्ये बीसीसीआयसारख्या स्वायत्त संस्थेचाही समावेश करून, सरकारने 'एक देश, एक व्यवस्था' या विचाराला मूर्त स्वरूप दिले आहे.

खेळ ही केवळ शरीरसंपदा किंवा मनोरंजनाची बाब नसून, राष्ट्रीय प्रतिष्ठेशी जोडलेली बाब आहे. ही विधेयक, जर योग्य रीतीने अंमलात आणले गेले, तर भारताला जागतिक क्रीडांगणात नवा उंचाव मिळेल. खेळाडूंना योग्य सन्मान, सुविधा आणि न्याय मिळेल — आणि एक दिवस भारतीय राष्ट्रगीत ऑलिंपिकमध्ये सर्वाधिक वेळा वाजवले जाईल — हे स्वप्न नकळत साकार होईल.

## डॉ. दिनेश कांबळे व डॉमिनिक डिमेलो ....पान नं १

या दोन्ही नियुक्त्या म्हणजे काँग्रेसने वसई-विरारच्या सामाजिक विविधतेचा योग्य अभ्यास करून प्रभावी नेतृत्वाला संधी देण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते. स्थानिक राजकारणात गेल्या काही काळात भाजप व शिवसेना (शिंदे गट) यांचे वर्चस्व वाढले असले, तरी काँग्रेसने या नियुक्त्यांद्वारे पुन्हा एकदा मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.या नियुक्त्यांमुळे पक्षातील नव्या कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळेल, असे मत युवक नेते व काँग्रेसचे विभागीय प्रवक्ते यांनी व्यक्त केले. दरम्यान, पक्षाचे ज्येष्ठ नेते राम पाटील यांनी या दोघांचे अभिनंदन करत, 'डॉ. कांबळे व डॉमिनिक डिमेलो यांचे नेतृत्व काँग्रेसला वसई-विरारमध्ये पुन्हा बळकट करेल,' असे वक्तव्य केले.

## मुंबई मनपातील सफाई ....पान नं ४

*हा टप्पा आहे. शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजेतून कामगारांना मालकी हक्क मिळवून देण्याबाबत महापालिका स्वतः पाठपुरावा करील असे आश्वासनही बैठकीत देण्यात आले.या ऐतिहासिक निणयामागे एकजुटीने लढलेले नेतेमंडळ आणि कामगारांची दीर्घकालीन चळवळ आहे. या बैठकीत समाजवादी कामगार नेते साथी कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरेश ठाकूर, विजय कुलकर्णी, अशोक जाधव, रमाकांत बने, वामन कविस्कर, मिलिंद रानडे, रंगा सातवसे, बाबा कदम, देवी गुजर, प्रकाश जाधव, शेषराव राठोड, प्रफुल्लता दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.या संघर्षात सहा संघटना एकत्र आल्या होत्या. त्यामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला. या लढ्याने पुन्हा एकदा सिद्ध केले की, संघटित संघर्ष, स्पष्ट भूमिका आणि सामाजिक न्यायासाठीची बांधिलकी असेल तर कोणताही अन्याय दूर करता येतो. हा विजय केवळ कामगारांच्या एकजुटीचा आणि त्यांनी न्यायासाठी दिलेल्या लढ्याचा आहे, असे मत हिंद मजदूर किसान पंचायतचे राज्य अध्यक्ष साथी कपिल पाटील यांनी व्यक्त केले आहे.*

*कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री आणि आयुक्त यांचे कामगारांच्या वतीने आभार मानले.*

*लवकरच विजय मेळावा –या लढ्याच्या ऐतिहासिक विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी लवकरच भव्य विजयी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.*

## वसई-विरारच्या पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्ष शशिकांत... पान नं ४.

प्रदेशाध्यक्षांनी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच वसई-विरारमधील पदाधिकाऱ्यांना पक्षाचा जनाधार वाढवण्याचे आणि सामाजिक कार्यक्रम राबवण्याचे निर्देश दिले.या भेटीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांचीही भेट घेऊन निवेदन सादर केले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरी प्रश्नांवर पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसादामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## वसई-विरारमध्ये प्लास्टिक ...पान नं ३

*आहेत. नियम तोडणाऱ्यांवर प्रथम दंहा साठी ५०००, दुसऱ्यासाठी १०००० आणि तिसऱ्यासाठी २५००० दंड आकारला जाणार आहे. समाजाचे पुढचे पाऊल काय?*

*वसई-विरार शहरासाठी प्लास्टिकमुक्ती ही केवळ कारवाईची बाब नाही, तर सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. फक्त प्रशासन नव्हे, तर प्रत्येक नागरिक, दुकानदार, हॉटेल चालक, फेरीवाले यांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. पर्यावरणाची हानी ही सर्वांचीच हानी आहे — आणि स्वच्छतेचा संकल्प 'आपला वसई-विरार, आपली जबाबदारी' म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. 'कायद्याचा बडगा हे एक पायरी आहे, पण खरी विजयाची सुरुवात होते ती जनजागृतीतून!' 'पालिकेच्या कडेकोट कारवाईस पाठबळ देणारी नागरिकांची मानसिकता आणि सहभागच शहराला खऱ्या अर्थाने प्लास्टिकमुक्त बनवू शकतो. पालिकेने केलेली कारवाई निश्चितच स्तुत्य आहे, पण तिचा उद्देश तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा प्रत्येक हातात कापडी पिशवी असेल आणि पर्यावरण हा आपला व्यक्तिगत अजेंडा बनेल*

## 'सांस्कृतिकवाद थोपवला जातोय, त्यामुळे फुले-शाहू-आंबेडकर चळवळीला गतिमान करणे अत्यावश्यक' – घटनातज्ज्ञ डॉ. सुरेश माने

आज भारतात धर्माच्या नावाखाली सांस्कृतिक वर्चस्ववाद जबरदस्तीने थोपवला जात असल्याची चिंता घटनातज्ज्ञ प्रा. डॉ. सुरेश माने यांनी व्यक्त केली. ते बहुजन साहित्य कला अकादमी आयोजित अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त चर्चासत्रात उद्घाटक म्हणून बोलत होते. मालधक्का चौक, पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात हा कार्यक्रम संपन्न झाला.डॉ. माने म्हणाले, 'भारतात सध्या धर्माच्या आडून चालणाऱ्या सांस्कृतिक राजकारणामुळे देशाचा खरा इतिहास, समतेची संस्कृती आणि लोकशाही मूल्यं मागे पडत चालली आहेत. ही स्थिती बदलायची असेल तर फुले, शाहू, आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीला गतिमान करणं अत्यंत गरजेचं आहे.'अण्णाभाऊंचं साहित्य म्हणजे संघर्षाची प्रेरणा अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते बहुजनांचा संघर्ष जिवंत ठेवणारे युगपुरुष होते. त्यांच्या साहित्याने समाजाला प्रश्न विचारण्याचं धाडस दिलं, आणि हीच प्रेरणा बहुजन समाजाला स्वाभिमानाने उभं राहण्याची ताकद देते,' असंही माने यांनी नमूद केलं.या वेळी प्रा. जी.क. येनापुरे आणि श्रीमंत कोकाटे यांनी अण्णाभाऊंच्या कार्याचा आढावा घेतला. धम्मकीर्ती महाराज परभणीकर आणि साहित्यिक लक्ष्मण गायकवाड यांनीही अण्णाभाऊंच्या साहित्यिक वारशावर भाष्य केलं. बहुजन कलेचा गौरव – राज्यस्तरीय पुरस्कार

'बहुजन साहित्य व कलेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना लवकरच राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल,' अशी घोषणाही प्रा. माने यांनी यावेळी केली.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी पुणे शहराध्यक्ष अमोल तुजारे, ॲड. अंबादास बनसोडे, अभय शेलार व धीरज बगाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पेल्हारः अनधिकृत बांधकामांवर पालिकेची गप्पी! नागरिकांमध्ये संतापाचा सूर

मौजे पेल्हार, सर्व्हे क्रमांक ४९ येथे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पालिका प्रशासनाच्या भूमिकेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही, संबंधित विभाग आणि प्रभाग समिती 'इ' यांच्याकडून केवळ दुर्लक्षच करण्यात आले आहे.

नियम आणि कायद्यांचे उल्लंघन करत उभ्या राहत असलेल्या या बांधकामांबाबत साधी नोटीसही पाठवण्यास प्रशासन तयार नसल्याची स्थिती असताना, संबंधित अधिकाऱ्यांची कार्यक्षमता आणि निष्पक्षता यावर संशय घेणे स्वाभाविक ठरते.







स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, 'विकासकांशी साटेलोटे' असल्यामुळेच कारवाई होत नसल्याचा आरोप वारंवार ऐकू येतो. एका वरिष्ठ नागरिकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, 'पालिकेच्या काही अधिकाऱ्यांनी तर अक्षरशः विकासकांना खांद्यावर बसवले आहे. ही स्थिती आमच्यासाठी लज्जास्पद आहे.

'पालिकेच्या कामकाजावर हा एक गंभीर आक्षेप असून, भ्रष्टाचाराचे संकेत यातून स्पष्टपणे उमटत आहेत. शहरात वाढत चाललेली अनधिकृत बांधकामे ही केवळ कायद्याचे उल्लंघन नाही, तर येत्या काळात नागरी सुरक्षेला आणि शहर नियोजनाला मोठा धोका निर्माण करणारी बाब आहे.प्रभाग समिती 'एफ' चे कार्यही यामध्ये प्रश्नास्पद ठरत आहे.

एका सामाजिक कार्यकर्त्याने सांगितले की, 'पालिकेच्या अनास्थेमुळेच अशा अनधिकृत बांधकामांना ऊत आला असून, हा प्रकार थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवले गेले असल्याशिवाय अशक्य आहे.'

प्रशासनासाठी हा इशारा!

सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने सत्य स्थितीची चौकशी करून, बांधकामावर आवश्यक ती कारवाई करणे ही कायद्याची आणि नैतिक जबाबदारी आहे.

अन्यथा, या प्रकारांमुळे पालिकेच्या विश्वासार्हतेवर गदा येऊन नागरिकांचा रोष आणखी तीव्र होईल.

अनधिकृत बांधकामे रोखण्याची जबाबदारी केवळ कायद्यापुरती मर्यादित नसून, ती नागरिकांच्या सुरक्षित भविष्यासाठी अत्यावश्यक आहे. प्रशासन जर याकडे दुर्लक्ष करत असेल, तर ही बाब जनतेच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर आहे.

# गोखिवरेत कचरा प्रश्नावर तोडगा? CND वेस्ट प्रकल्पास वेग — पण राजकीय पक्षांचे श्रेयवादाचे नवे राजकारण!

गोखिवरे (वसई) येथे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी CND वेस्ट प्रकल्पास आता गती मिळणार आहे, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले असले तरी, या प्रकल्पाभोवती नवे राजकीय समीकरण आणि श्रेयवादाचे राजकारण तापू लागले आहे.वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील गोखिवरे डंपिंग ग्राऊंडवरील कचरा समस्येने नागरिक त्रस्त झाले असतानाच, राज्य शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आलेल्या CND वेस्ट (Construction and Demolition Waste) प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. हा प्रकल्प कायमस्वरूपी तोडगा असेल, असा दावा प्रशासकीय यंत्रणेने केला आहे.परंतु, प्रकल्पाची घोषणा होताच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये श्रेय घेण्यासाठी चुरस निर्माण झाली आहे. काही स्थानिक नेत्यांनी आधीच पोस्टरबाजी आणि पत्रकार परिषदा घेत 'हा आमच्या पाठपुराव्याचा विजय' असल्याचे जाहीर करायला सुरुवात केली आहे. काहीजणांनी महसूल विभाग, पालिकेचे अधिकारी




व राज्य सरकारवर दबाव टाकल्याचा दावा केला आहे.राजकीय श्रेयवाद की जनहित?या प्रकल्पासंबंधी स्थानिक राजकीय नेतृत्वाने विविध पातळ्यांवर निवेदनं दिली, आंदोलनं केली, हे नाकारता येणार नाही. मात्र या मागे खरे जनहित आहे की केवळ आगामी निवडणुकीची तयारी? असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.कायद्याच्या चौकटीतील मुद्देया प्रकल्पासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया — पर्यावरण मंजुरी, कंत्राटदाराची नियुक्ती, कचरा वर्गीकरण, नागरिकांची मंजुरी व इतर प्रशासकीय प्रक्रिया — या सर्व गोष्टी पारदर्शक व कायदेशीर मार्गाने पूर्ण झाल्या आहेत का? याकडे अनेक पर्यावरण कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९४९ आणि पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत अशा प्रकल्पांकरिता स्पष्ट नियमावली आहे, जी पूर्ण झाली का, हे तपासणे गरजेचे आहे.नागरिकांच्या अपेक्षा काय?स्थानिकांनी अनेक वर्षांपासून कचऱ्याच्या दुर्गंधी, प्रदूषण, डास आणि रोगराईला सामोरे जावे लागत असल्याने, ते केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा करत आहेत. सर्व राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन नागरिकांसाठी एकमताने निर्णय घेणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हेच अपेक्षित आहे.।

# वसई-विरारमध्ये प्लास्टिक मुक्तीकडे ठाम वाटचाल! — ५५ हजार किलो प्लास्टिक जप्त, २१ लाखांचा दंड वसूल

पर्यावरणपूरक जीवनशैली आणि शाश्वत नागरी व्यवस्थापनाच्या दिशेने पाऊल उचलत वसई-विरार महापालिकेने गेल्या तीन वर्षांत ५५ हजार ४६४ किलो प्लास्टिक जप्त करताना तब्बल २१ लाख ९१ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. ही कामगिरी निश्चितच उल्लेखनीय असली तरीही प्लास्टिकच्या वापरावर पूर्णतः अंकुश बसलेला नाही, याची खंत जनतेतून व्यक्त होत आहे.

सरकारचा आदेश, पालिकेचा कृतीशील प्रतिसाद

प्लास्टिक बंदीचा आदेश महाराष्ट्र शासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केल्यानंतर वसई-विरार महापालिकेने त्याची अंमलबजावणी करत सतत छापे व कारवाईचे धोरण राबवले. यामध्ये थर्मोकोल व सिंगल-यूज प्लास्टिकसह विविध प्रतिबंधित वस्तूंचा समावेश होता. मात्र, काही काळ कारवाई थांबल्यानंतर पुन्हा एकदा पालिकेने कारवाईला गती दिली आहे.

सामाजिक जागरूकतेची गरज

दुर्दैवाने अजूनही शहरातील अनेक भागांत, विशेषतः फेरीवाल्यांकडून आणि लहान दुकानांत प्लास्टिक पिशव्यांचा वापर सर्रास सुरू असल्याचे निदर्शनास येते. यामध्ये अनेक विक्रेते सायंकाळी लपवाछपवीने विक्री करत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येतो. त्यामुळे कारवाईची वेळ फक्त सकाळीच न ठेवता सायंकाळीही तपासणी वाढवावी, अशी मागणी आहे.

स्वतःहून उदाहरण ठरतेय महापालिका प्रशासन

महापालिकेच्या मुख्यालयासह सर्व प्रभाग कार्यालयांमध्ये सिंगल-यूज प्लास्टिकवर संपूर्ण बंदी घालण्यात आली असून, कापडी पिशव्यांचा वापर सक्तीचा करण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी नुकतेच परिपत्रक काढून पालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना प्लास्टिक टाळण्याचे आदेश दिले

पान नं.२वर

# मुंबई मनपातील सफाई कामगारांचा ऐतिहासिक विजय!

## ८ हजार कंत्राटी कामगार कायम होणार,

### लाडे पागे समितीच्या शिफारशी लागू होणार त्याचा फायदा ५० हजार कामगारांना,कामगारांना सरकारी योजनेतून मालकी हक्कांची घरे, महापालिकेचा पाठपुरावा!

### समाजवादी नेते कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखालील लढ्याला मोठे यश लवकरच विजय मेळावा

मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांच्या लढ्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. ८ हजार कंत्राटी कामगार कायम होणार असून, यासोबतच लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू करण्यात येणार असल्याने विविध आस्थापनांतील सुमारे ५० हजार कामगारांना त्याचा थेट लाभ मिळणार असल्याचे काल मनपा प्रशासनासोबत झालेल्या करारात स्पष्ट झाले.या ऐतिहासिक विजयाचे नेतृत्व समाजवादी कामगार नेते साथी कपिल पाटील यांनी केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली काल २८ जुलै २०२५ रोजी ही निर्णायक बैठक पार पडली.मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्याकडे कपिल पाटील यांनी सफाई कामगारांच्या आंदोलनाबाबत रदबदली केली होती. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर संप टळला होता. स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार मनपा आयुक्तांसोबत कामगार संघटनांच्या दोन बैठका झाल्या. सफाई कामगारांच्या मागण्यांना न्याय देण्याचा मार्ग मोकळा झाला.म्युनिसिपल कामगार ॲक्शन कमिटी आणि मनपा कामगार संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने या बैठकीत सहभाग घेतला आणि अनेक मागण्यांवर ठोस निर्णय घेण्यात आले. विशेष म्हणजे, कोणतेही पद कमी न करता ८ हजार कंत्राटी कामगारांना कायम करण्यात येणार आहेत, लाड पागे समितीच्या शिफारशी लागू होणार असून त्याचा थेट लाभ ५० हजार कामगारांना मिळणार हे या कराराचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक यश ठरते. लाड-पागे समितीच्या शिफारसी अंमलात आणण्याचा निर्णय फक्त काही निवडक कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित न राहता सुमारे ५० हजार कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा होईल. वेतन, सेवा-सुविधा आणि सुरक्षितता यांच्याबाबतीत मोठा बदल घडवणारा पान नं.२वर

# महसूल सप्ताहः जनतेशी थेट संवाद साधणारा सामाजिक उपक्रम

जिल्ह्यात १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह २०२५ साजरा करण्यात येत असून, याचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी सुभाष भांगरे, महेश माने, तेजस चव्हाण, विजय जाधव, महिला जिल्हाधिकारी दीपाली पाटील यांच्यासह प्रशासनातील विविध अधिकारी उपस्थित होते.महसूल विभाग हे प्रशासनातील एक महत्त्वपूर्ण यंत्रणा असून, नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी थेट संबंधित सेवा पुरवणारा विभाग आहे. शासकीय योजना, मालमत्ता दाखले, जमीन फेरफार, जात व उत्पन्न प्रमाणपत्रे या सर्व सेवा सामान्य जनतेसाठी अत्यंत उपयुक्त असतात. महसूल सप्ताहाच्या निमित्ताने या सेवांबाबत जनजागृती करणे व तातडीने सेवा देणे हा खरा उद्देश आहे.या सप्ताहात विविध शिबिरे, माहिती सत्रे, ग्रामसभांमधील जनसंपर्क, तसेच डिजिटल सेवा सुविधा यांचा लाभ घेता येतो. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरते.महसूल सप्ताहाची सुरुवात २०१४ साली झाली होती. आज ११ वर्षांनंतरही या उपक्रमाची प्रभावीता टिकवून ठेवणे ही कौतुकास्पद बाब आहे. जिल्हा प्रशासनाने यंदाही उत्तम नियोजन व समन्वय साधून हे आयोजन केले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिक सशक्तीकरण, न्याय्य सेवा वितरण, आणि विश्वासार्ह प्रशासन हे ध्येय साध्य होत आहे. शासनाच्या 'जनतेच्या दारी प्रशासन' या संकल्पनेला खऱ्या अर्थाने यामुळे बळकटी मिळत आहे.प्रशासनाच्या प्रत्येक योजनेमागे जर अशी सामाजिक बांधिलकी असेल, तर शासन व जनता यांच्यातील दरी नक्कीच कमी होईल. महसूल सप्ताह म्हणजे केवळ एक औपचारिक कार्यक्रम नाही, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेचा एक प्रत्यक्ष पुरावा आहे.




# वसई-विरारच्या पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याशी भेट

## नागरी समस्यांवर निवेदन सादर, प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्त झाल्यानंतर शशिकांत शिंदे यांनी मुंबईतील प्रदेश कार्यालयात पहिल्यांदाच जनता दरबाराचे आयोजन केले. यावेळी वसई-विरार शहरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी विविध नागरी समस्या आणि प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा करत निवेदन सादर केले.वसई-विरारमधील शिष्टमंडळात जिल्हा मीडिया प्रमुख कमर बेग, हरीश कोटकर आणि अन्य पदाधिकारी सहभागी होते.मुख्य निवेदनात आयआयटी मुंबई व नीरी यांना देण्यात आलेल्या निधीनंतरही अहवालानुसार अपूर्ण कामांचा उल्लेख करण्यात आला.एसटीपी, होल्डिंग पॉन्ड्स, कल्व्हर्ट, तसेच मालमत्ता व आरोग्य विभागातील भ्रष्टाचाराचे आरोप मांडण्यात आले.

एफओबी आणि आरओबी ही कामे गेल्या १० वर्षांपासून रखडल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.





नवीन इमारतींसाठी सीसी परवानग्या रोखाव्यात, जोपर्यंत मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाहीत, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

पाणीपुरवठा समस्या, तसेच रस्ते व गटारांमधील गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी.

या बैठकीत चर्चगेट ते विरार एलिव्हेटेड रेल्वे कॉरिडॉर प्रकल्पाचा मुद्दा केंद्रस्थानी होता. या प्रकल्पासाठी झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती देऊन नायगाव ते विरार भागात हस्ताक्षर मोहिम राबवण्याची भूमिका मांडण्यात आली.तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध रखडलेल्या योजनांचा तपशील देत, महानगरपालिका मुख्यालयाच्या आरक्षित भूखंडावर ७ वर्षांपूर्वी भूमिपूजन होऊनही काम सुरू न झाल्याचे निदर्शनास आणले गेले. या सर्व मुद्यांवर प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी सकारात्मक चर्चा करत संबंधित नेत्यांशी समन्वयाचे आश्वासन दिले.

पान नं.२वर

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in